जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८८५ दिनांक - १९/१२/२०२३**

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर

# परराज्यातून येवून गुगलवर उचभ्रू परिसर सर्च करुन घरफोडी करणा-या आरोपीस केले जेरबंद

दि. ०६/१०/२०२३ ते दि. ०८/१०/२०२३ रोजीचे दरम्यान फिर्यादी सर्व कुटूंबियासोबत फार्महाऊस येथे असताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे राहते घर कल्याणीनगर येथील बंगल्याचे खिडकीचे ग्रील कशाचे तरी सहायाने उचकटुन आतमध्ये प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाट कशाचेतरी सहाय्याने उचकटून कपाटामध्ये ठेवलेले ७,५४,०००/- रु किं.चे सोन्या चांदीचे दागिने व २,५०,०००/- रोख रक्कम असा एकुण १०,०४,०००/- रु किं.चा मुद्देमाल घरफोडी करुन चोरुन नेला आहे.बाबत येरवडा पो स्टे गु र नं ६८९/२०२३ भादवि ४५४,४५७,३८०,३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचा तपास करत असताना तपास पथकातील अधिकारी व स्टाफ यांनी कल्याणीनगर, पुणे रेल्वे स्टेशन, स्वारगेट, कात्रज, नानापेठ या ठिकाणचे सुमारे ३०० चे आसपास सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेज चेक करुन आरोपी निष्पन्न केले. तसेच तपासा दरम्यान चतुश्रृंगी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये,भोसले नगर येथे दोन ठिकाणी देखील घरफोडी झाली होती. सदर ठिकाणचे उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता कल्याणीनगर येथील व भोसलेनगर येथील आरोपी एकच असलेचे दिसुन आलेने व पोलीस हवा किरण घुटे यांनी तांत्रिक विश्लेषण करुन दाखल गुन्हयातील आरोपी हे तेलंगणा येथील असल्याचे निष्पन्न झालेने वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांनी मार्गदर्शन केले त्याप्रमाणे येरवडा व चतुश्रृंगी तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तेलंगणा येथे जावून संशयीत इसमास पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले. सदर आरोपीस पकडून त्यास नाव पत्ता विचारता **नरेंद्र बाबु नुनसावत वय २७ वर्षे रा आरटीसी कॉलनी कमान टीकेआर कॉलेज इंदिरानगर मीरपेठ हैद्राबाद तेलंगणा** असे असल्याचे सांगितले. सदर गुन्हयाचे अनुषंगाने त्याचेकडे अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा त्याचे इतर साथीदार नामे सतिश बाबू करी रा. हैद्राबाद तेलंगणा व गुरुनायक केतावत रा. हैद्राबाद तेलंगणा यांचे साथीने केल्याचे कबूल केले असुन,मोठया शहरामध्ये जाऊन इंटरनेट वरुन रिच एरिया सर्च असे करुन,त्यावरुन प्राप्त माहीतीचे आधारे सदर परिसरामध्ये रेखी करुन,रात्रीचे वेळी घरफोडी करीत असले बाबत सांगितलेले आहे.

अटक आरोपी नामे नरेंद्र नुनसावत याचेवर यापुर्वी तेलंगणा, हैद्राबाद, तिरुपती, चेन्नई या ठिकाणी घरफोडी चे गुन्हे दाखल असून त्यामध्ये त्यास अटक करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपीस दि. १२/१२/२०२३ रोजी गुन्हयात अटक करण्यात आली असुन, आरोपीकडून सोन्याचांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. सदर आरोपीकडे आणखी तपास करता त्यांनी अशाच प्रकारे भोसलेनगर पुणे येथे गुन्हे केल्याचे कबूल केले आहे त्यानुसार चतुश्रृंगी पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर पडताळणी केली असता चंतुश्रृगी पो स्टे गु र नं ८७२/२०२३ भादवि ४५४,४५७,३८०,३४ व गु र नं ८७५/२०२३ भादवि ४५४,४५७,३८०,३४ अन्वये गुन्हे दाखल असून सदरचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि अंकुश डोंबाळे करत आहेत.
आरोपीकडून येरवडा व चंतुश्रृगी पो स्टे कडील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, श्री रंजनकुमार शर्मा, मा.उप-आयुक्त, परिमंडळ-४ श्री शशिकांत बोराटे पोलीस, मा.सहा. पोलीस आयुक्त, येरवडा विभाग श्री संजय पाटील, येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक गुन्हे श्रीमती कांचन जाधव, श्री. जयदिप गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप निरी अंकुश डोंबाळे, पोउपनि प्रदिप सुर्वे, पोलीस अंमलदार गणपत थिकोळे, दत्ता शिंदे, तुषार खराडे, किरण घुटे, अमजद शेख, कैलास डुकरे, सागर जगदाळे, अनिल शिंदे, राहुल परदेशी, सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे, सुशांत भोसले तसेच चंतुश्रृगी पोलीस स्टेशन तपास पथकाचे अधिकारी सपोनि नरेंद्र पाटील, पोलीस अंमलदार श्रीकांत वाघोले, इरफान मोमीन, ज्ञानेश्वर मुळे, प्रदिप खरात यांनी केलेली आहे.

